लोकमत पु. पा. १.

# धुळीत हरवले मीरा-भाईंदर

## प्रदूषण वाढले : नागरिकांच्या नाकातोंडात जातेय धूळ

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर शहरात मोठ्या प्रमाणात चालणारी इमारतींची कामे, सिमेंट काँक्रिट रस्त्यांची कामे, आरएमसी प्लांट आदींमुळे शहरात मोठ्या प्रमाणात धुलिकण हवेत पसरले आहेत. यामुळे नागरिकांच्या आरोग्यासह पर्यावरणाला धोका निर्माण होऊन नागरिक त्रस्त झाले आहेत.

मुंबईला लागून असल्याने मीरा-भाईंदर शहरात बांधकामे मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. शहरात उत्तुंग इमारतींची कामे जोरात आहेत. याशिवाय अनधिकृत बांधकामे आदी नेहमीप्रमाणेच उभारली जात आहेत. शहरात एमएमआरडीए व महापालिकेने सिमेंट काँक्रीट रस्त्यांची कामे चालवली आहेत. त्यासाठी रस्ते खोदकामापासून खडी, रेती, सिमेंट आदींचा वापर केला जात आहे. या रस्ते आणि इमारत बांधकामातून मोठ्या प्रमाणात धूळ-सिमेंट हवेत पसरत आहे. अनेक रस्त्यांमध्ये खड्डे पडले असून, त्यातूनसुद्धा धूळ-सिमेंट उडत आहे. रस्त्यांवरून जाताना तर सर्रास धूळ-सिमेंट हवेत असल्याने त्यातूनच लोकांना मार्ग काढावा लागत आहे. डेब्रिज, माती, खडीची वाहतूक करणारे डंपर आदी वाहनेदेखील धूळ उडवत व रस्त्यावर पाडत जात असतात. लोकांना श्वास घेण्यासाठी शुद्ध हवेऐवजी धूळ-सिमेंट श्वासात नाईलाजाने घ्यावे लागत आहे.

शहरातील बांधकामासाठीचे उत्खनन करताना, जुन्या धोकादायक इमारती तोडताना तसेच काँक्रीट बनवणाऱ्या आरएमसी प्लांटमुळेदेखील मोठ्या प्रमाणात हवेत प्रदूषण पसरले आहे. धूळ-सिमेंटमुळे अनेक भागात लोकांना आपली दारे-खिडक्या बंद ठेवण्याची पाळी येत आहे. कारण हवेतील धूळ-सिमेंट घरातील सामान, भांड्यांवर बसत असल्याने त्याची साफसफाई नियमित करावी लागत आहे. रस्त्याच्या कडेला उघड्यावर खाद्यपदार्थ बनवणे, विकणे व खाणेदेखील या धुलिकणांमुळे आरोग्याला अपायकारक ठरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



मीरा-भाईंदर शहरात अनेक ठिकाणी रस्त्यांची कामे सुरु असल्याने बहुतांश ठिकाणी धूळ मोठ्या प्रमाणात दिसून येते.

### गुणवत्ता सुधारण्यात पालिका अपयशी?

- हवेची गुणवत्ता सुधारण्यात महापालिका अपयशी ठरली आहेच, पण बांधकाम सुरु असलेल्या इमारती, रस्ते बांधकाम, आरएमसी, खोदकाम, जुन्या इमारती पाडकाम आदींना हवेतील प्रदूषण रोखण्यासाठी दिलेले निर्देश केवळ कागदावरच धूळ खात पडलेले आहेत, असे शहरातील चित्र आहे.
- हवेची गुणवत्ता सुधारण्यात पालिका अपयशी ठरली असून, प्रदूषण नियंत्रण मंडळही जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप जागरूक नागरिकांनी केला आहे.

# मविआचे ठरले मात्र महायुतीचा तिढा सुटेना

## मीरा-भाईंदरमधून काँग्रेसचा उमेदवार जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदरमधून महाविकास आघाडीची उमेदवारी काँग्रेस नेते माजी आ. मुझफ्फर हुसेन यांना जाहीर झाली आहे. दुसरीकडे महायुतीत शिंदेसेना व भाजपतील तिढा कायम आहे. भाजपच्या दुसऱ्या यादीतही मीरा-भाईंदरचा उमेदवार जाहीर झाला नसल्याने इच्छुकांसह समर्थकांची घालमेल वाढली आहे.

महाविकास आघाडीत मीरा-भाईंदर विधानसभा मतदार संघ काँग्रेसच्या वाट्याला जाऊन काँग्रेसने येथून मुझफ्फर हुसेन यांची उमेदवारी पहिल्याच यादीत जाहीर केली. २०१९ च्या निवडणुकीत त्यांना ५५ हजार मते मिळाली होती व ते तिसऱ्या क्रमांकावर होते. अपक्ष उमेदवार गीता जैन या तत्कालीन भाजप आ. नरेंद्र मेहतांसह मुझफ्फर यांचा पराभव करून निवडून आल्या होत्या.

### शिंदेसेनेचाही दावा

भाजपने मागच्या दोन विधानसभा निवडणूक लढवल्या असून माजी नगरसेवकाची संख्या जास्त असल्याने भाजप जागा सोडण्यास तयार नाही. तर आ. जैन या आपल्यासोबत होत्या व त्या अपक्ष निवडून आल्या म्हणून शिंदेसेनेने या जागेवर दावा केला आहे. सेनेच्या स्थानिक पदाधिकारी यांनी मात्र विक्रम प्रताप सिंह यांना उमेदवारीची मागणी केली आहे.

### भाजपत अंतर्गत कलह

आ. जैन यांनी भाजपसह शिवसेना, अपक्ष म्हणून अर्ज घेतले आहेत. मेहतांनी स्वतःसह पत्नी सुमन यांच्या नावेदेखील भाजप व अपक्ष म्हणून अर्ज घेतले आहेत. मेहतांनी, आपल्याला नाही तर निदान पत्नीस तिकीट मिळाली पाहिजे, अशी रणनीती आखल्याची चर्चा आहे. एकूणच भाजपात अंतर्गत कलह व चुरस आहेच; पण भाजपा व शिंदेसेनेत देखील जागेवरून रस्सीखेच सुरु आहे.

लोकमत पु.प. १

# दोन सोनसाखळी चोरांना अटक

## चार गुन्ह्यांची उकल : विरार गुन्हे शाखेची कामगिरी

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : सोनसाखळी चोरी करणाऱ्या दोन सराईतांना विरारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी ७५ ते ८५ सीसीटीव्ही तपासून अटक केली आहे. दोन्ही आरोपींकडून चार गुन्ह्यांची उकल करण्यात यश मिळाल्याची माहिती शनिवारी जनसंपर्क अधिकारी व स.पो.नि. शिवकुमार गायकवाड यांनी दिली.

कारगिलनगर येथील शिवआशिष येथे राहणाऱ्या सुनंदा पवार (५६) या १८ ऑक्टोबरला रस्त्याने चालत असताना डॉन बास्को चर्चजवळ दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी त्यांना शिवीगाळ, धक्काबुक्की करत जमिनीवर पाडून गळ्यातून मंगळसूत्र खेचले होते. विरार पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. वरिष्ठांनी गुन्हा लवकर उघडकीस आणण्यासाठी सूचना दिल्या होत्या. त्यानुसार तपास सुरू होता.



विरारच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी दोन सराईत चोरट्यांना सापळा रचून अटक केली.

### सापळा रचून घेतले ताब्यात

- गुन्हा करणारे हे कातकरी पाडा, चंदनसार रोड या परिसरातील असल्याची माहिती मिळाली.
- गुन्हे प्रकटीकरण पथकाने त्या परिसरात सापळा रचून अनेक गुन्हे करणारा सराईत हद्दपार गुन्हेगार शंकर दिवा (वय ३७) आणि त्याचा साथीदार राजेश वाघ (२१) या दोघांना ताब्यात घेतले.
- दोन्ही आरोपींकडे केलेल्या तपासात विरारप्रमाणे आचोळा, नालासोपारा, माणिकपूर पोलिस ठाण्यांच्या हद्दीत चालत जाणाऱ्या महिलांच्या गळ्यातून सोनसाखळी चोरल्याचे गुन्हे केल्याचे तपासात उघड झाले. दोघांकडून चार गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे.

# रूमच्या नावावर महिलेला लाखोंचा गंडा

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : वालीवच्या ओम लेक व्यूव्ह सोसायटीत राहणाऱ्या ज्योती म्हात्रे यांची ५ जुलै २०१७ ते १५ जून २०२४ दरम्यान रूमच्या नावावर फसवणूक झाली आहे.

त्यांचे पती यांनी संजय म्हात्रे याच्यासोबत ओम लेक व्यूव्ह सोसायटीतील सदनिकेचा १२ लाख ५० हजार रुपयांना सौदा केला. त्या सौद्यासाठी आजपर्यंत ज्योती यांनी संजय म्हात्रे याला ८ लाख ६१ हजार रुपये दिले. मात्र पैसे देऊनही त्यांना अद्यापपर्यंत रूम नावावर करून दिलेली नाही. तसेच त्यांच्याकडून मिळालेली रक्कम भाडे स्वरुपात कपात केल्याचे सांगितले. तसेच रूम नावावर करून देण्यासाठी तगादा लावल्यावर त्यांना धमकी देऊन त्यांच्या रकमेचा अपहार करून फसवणूक केली आहे. वालीव पोलिसांनी याप्रकरणी शुक्रवारी गुन्हा दाखल केला आहे.

# अनधिकृत बांधकाम; गुन्हा दाखल




नालासोपारा : गाव मौजे विरार सर्व्हे नंबर ७०, हिस्सा नंबर ५ अ या ठिकाणी १६ नोव्हेंबर २०२१ ते आजपर्यंत चार मजली श्री साई मंगलम अपार्टमेंट ही इमारत बांधल्याप्रकरणी शुक्रवारी विरार पोलिस ठाण्यात एमआरटीपीचा गुन्हा दाखल झाला आहे. विकसक हितेश परमार व इतर आणि जागा मालक नारायण देशमुख यांनी याठिकाणी कोणत्याही सक्षम प्राधिकरणाची परवानगी न घेता अनधिकृत इमारतीचे बांधकाम केले आहे. मनपा अधिकारी संतोष घोलप (५४) यांनी याविरोधात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पु.प. ३

# महिलेची आत्महत्या

नालासोपारा : वसईच्या वाघराळ पाड्यातील दुकानात अनितादेवी राजभर (वय २५) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. २३ ऑक्टोबरला पतीसोबत झालेल्या भांडणाचा राग मनात धरून दुकानातील छताच्या लाकडाला साडीच्या साहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली. वालीव पोलिसांनी नोंद केली आहे.

CamScanner

पुण्यनगरी पृ. पा. १

# टोल बंद; तरीही कोंडी मात्र कायम !

## ▌दहिसर टोलनाक्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा ▌इंधन, वेळ, पैसा जातोय वाया

। मीरा रोड - राज्य शासनाने विधानसभा निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून मुंबईतील प्रवेशद्वारावर असलेले पाच टोलनाके हलक्या वाहनांना बंद करण्याचा निर्णय घेतला. त्या निर्णयानुसार १५ ऑक्टोबरला मध्यरात्रीपासून हलक्या वाहनांना टोल घेणे बंद केले आहे. हलक्या वाहनांकडून टोल घेणे बंद झाले असले तरी वाहतूक कोंडी कायम तशीच आहे. त्यामुळे शासनाने टोलनाका बंद केला असला तरी दहिसर टोलनाक्यावर वाहनांच्या लांब रांगांमुळे होत असलेल्या कोंडीतून सुटका कधी होणार, असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.

राज्य शासनाने हलक्या वाहनांना टोल वसुलीतून सुटका केली. मुंबईत प्रवेश करणाऱ्या हलक्या वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. यामुळे टोलनाक्यावर टोल भरण्यासाठी वाहनांच्या रांगा लागत असल्यामुळे वाहतूक कोंडी होत होती. वाहतूक कोंडीमुळे इंधन, वेळ व पैसा खर्च करावा लागत होता. हलक्या वाहनांना टोलमाफी करावी, यासाठी काही वर्षांपासीन मागणी करण्यात येत होती.

राज्य शासनाने विधानसभा निवडणुका डोळ्यांमोर ठेवून मुंबईतील प्रवेशद्वारावर असलेले पाच टोलनाके हलक्या वाहनांना बंद करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा वाहतूक कोंडीतून सुटका होइल व आर्थिक बचत होईल, यामुळे वाहनचालकांनी आनंद व्यक्त केला होता. परंतु टोलवसुली बंद झाली तरी कोंडी कायम आहे. दहिसर टोलनाक्यांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहेत. वाहनचालकांना जाण्यासाठी १५ मिनिटांचा वेळ लागतो. परंतु वाहतूक कोंडीमुळे एकदीड तास लागत आहे.

मीरा-भाईंदर, वसई, विरार आणि गुजरात येथून मुंबईला जाणाऱ्या गाड्याना दहिसर टोलनाक्यावरून जावे लागते. छोट्या वाहनांना टोलमाफी दिल्याने दहिसर टोलनाक्यांवर वाहतूक कोंडीची समस्या दूर होऊन नागरिकांच्या समस्या कमी होतील, अशी अपेक्षा होती. परंतु वाहतूक कोंडी काही कमी झालेली दिसत नाही. आजही दहिसर चेक नाक्यावर पूर्वीप्रमाणेच वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत आहे. त्यामुळे कोंडी होत आहे. सर्वसामान्यांना या टोलमाफीचा फारसा फायदा झालेला दिसत नाही. पैशांची बचत होत असली तरी वाहनचालकांना पूर्वीपेक्षा जास्त वेळ लागत आहे.



◆दहिसर टोलनाक्यांवर जाताना काशिमीरा येथील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडलेले आहेत. तसेच मेट्रोचे काम सुरू असल्यामुळे वाहतूक कोंडीत वाढ होत असल्याचे सांगितले जाते. टोलमाफीचा वाहतुकीवर कोणताही परिणाम झाला नसल्याचे दिसून येत आहे.

◆ दररोज दहिसर चेक नाका ते काशिमीरा, घोडबंदरपर्यंत नेहमी वाहतूक समस्येला तोंड द्यावे लागते. टोलमाफीचा उद्देशही वाहतूक कमी करणे हा आहे, पण त्यासाठी व्यवस्था करणे आवश्यक आहे.

> “ दहिसर चेकनाक्यावर होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे प्रदूषणाची पातळी वाढली आहे. वाहनांमधून सतत निघणाऱ्या धुरामुळे आजूबाजूच्या परिसरात हवेची गुणवत्ता ढासळत आहे. हवा प्रदूषित झाली आहे. त्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांना सकाळी आणि संध्याकाळी जॉगिंग करणे आरोग्यासाठी हानिकारक ठरत आहे. त्यामुळे प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देण्याची गरज असल्याचे नागरिक सांगत आहेत.
>
> \- डॉ. राजेश शुक्ला

पुण्यनगरी पृ.पा ४

# गुंतवणुकीचे आमिष दाखवून फसवणूक

## ■ सायबर पोलिसांनी रक्कम मिळवून दिली परत

**■ मीरा रोड :** मीरा रोड येथे राहणाऱ्या व्यक्तीला त्याच्या मोबाईलवर एका अनोळखी व्यक्तीने लिंक पाठवून शेअर ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक करण्यास सांगून फसवणुक केली होती. या फसवणूक झालेल्या रकमेपैकी २० लाख २५ हजार रुपये तक्रारदारांना सायबर पोलिसांनी तपास करून परत मिळवून दिले आहेत.




मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील नयानगर पोलीस ठाणे हद्दीत राहणारे तक्रारदार दत्तानी यांच्या मोबाईलवर फेक शेअर ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक करण्यासाठी अनोळखी लिंक प्राप्त झाली. या लिंकमध्ये ऑनलाईन शेअर ट्रेडिंग करून अधिक लाभ मिळत असल्याचे आमिष दाखवून गुंतवणूक करण्याबाबत सांगितले होते. तक्रारदाराने आलेली लिंक ओपन करून पैशाची गुंतवणूक केली. परंतु त्यांना गुंतवणूक केल्यानंतर कोणताही परतावा मिळाला नाही. त्यावर तक्रारदार यांना आर्थिक फसवणूक झाल्याने सायबर पोलीस ठाण्यात तक्रारअर्ज सादर केला. सायबर पोलीसांनी याची नोंद घेतली. तसेच ऑनलाईन एनसीसीआरपी पोर्टलवर तक्रार नोंदविण्यात आली.

तक्रारदाराने ऑनलाईन एनसीसीआरपी पोर्टलवर तक्रार नोंदविल्याने फसवणुकीची वर्ग झालेली रक्कम संशयित बँक खात्यात थांबवण्यात आली. तक्रारदाराची बँक खात्यांमध्ये थांबवण्यात आलेली रक्कम परत मिळवण्यासाठी न्यायालयमध्ये अर्ज सादर करण्याबाबत तक्रारदारांना सूचना देण्यात आल्या. तक्रारदाराने फसवणुकीची रक्कम परत मिळवण्यासाठी न्यायालयात याचिका सादर केली. त्याबाबत सायबर पोलीस ठाणे यांनी न्यायालयात सविस्तर अहवाल सादर केला व न्यायालयाचे आदेश प्राप्त केले. अशा प्रकारे सायबर पोलीस ठाणे यांनी बँकेसोबत तसेच न्यायालयाकडे पाठपुरावा करून तक्रारदाराची फसवणूक झालेले २० लाख २५ हजार रुपये त्यांच्या मूळ खात्यात परत मिळवून दिले.

पुण्यनगरी पृ.पा ७

# बुलेट, मोबाईल चोराला अटक

**■ वसई :** बुलेट आणि मोबाईल चोरट्याला अटक करून त्याच्याकडून चार गुन्ह्यांची उकल करण्यात तुळींज गुन्हे प्रकटीकरण शाखेला यश आले आहे. एका मोबाईल चोरीचा तपास करताना पोलीस शिपाई पोटे यांना चोरट्यांची माहिती मिळाली. त्याअनुषंगाने शिवम सुधीर झा याला सहकार नगर, विरार, (पू.) येथून अटक करण्यात आली. त्याची झाडाझडती घेतल्यावर बुलेट बाईक, मोबाईलची चोरी करत असल्याचे दिसले. झा याने गेल्या १५ दिवसांत विरारमधील दोन दुचाकी आणि नालासोपारातील एक दुचाकी चोरी केल्याचे निष्पन्न झाले. त्याच्याकडून १ मोबाईल आणि तीन दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहेत.



त्याच्याकडून तुळींजमधील १, विरारमधील २ आणि नालासोपारातील १ असे ४ गुन्हे उघडकीस आणले आहे. दोन लाख ५० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

पुण्यनगरी पृ.पा ८

# लिफ्ट देण्याच्या बहाण्याने प्रवाशांना लुटले

## २४ तासांत चौघांना अटक, विरार पोलिसांची कामगिरी

**वसई :** लिफ्ट देण्याच्या बहाण्याने प्रवाशांना लुटणाऱ्या चौघांना अवघ्या २४ तासांत अटक करण्याची कामगिरी विरार पोलिसांनी केली आहे. विशेष म्हणजे मानवी हक्क परिषद चा लोगो लावलेल्या कारमधून ही वाटमारी करण्यात आल्याचे उघड झाले आहे.

२० ऑक्टोबरच्या पहाटे ३.३० वाजता विरारमधील एका नागरिकाला लिफ्ट देण्याच्या बहाण्याने ४ अनोळखी व्यक्तींनी कारमध्ये बसवले. त्यानंतर प्रवाशाला चाकूने हातावर, डोक्यावर मारहाण करून मोबाईल फोन, पाकीट रोकड आणि ब्लुटूथ लुटून ते पळून गेले. त्यामुळे प्रवाशाने विरार पोलीस ठाणे गाठले. या घटनेचे गांभीर्य ओळखून गुन्हे प्रकटीकरण पथकाने तात्काळ तपास सुरू केला. या पथकाने घटनास्थळी जाऊन सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यातून तक्रारदाराला लुटणाऱ्या कारच्या मागील बाजूस एक लोगो दिसून आला. या लोगोचा सीसीटीव्ही कॅमेऱ्यामार्फत बारकाईने तपास केल्यावर लोगो मानवी हक्क परिषद असा असल्याचे निष्पन्न झाले. तसेच कार धानीवबाग, नालासोपारा, पूर्वेतील गुफरान खान यांच्या मालकीची असल्याचे उघड झाले. त्याअनुषंगाने गुन्हे शाखेच्या पथकाने गुफरान खानची चौकशी केली. त्यांनी कार अशरफ मोहमद इशाहक रंगरेझाला चालविण्यास दिल्याचे सांगितले. त्यानुसार अशरफ इशाहकच्या बोरिवली येथून मुसक्या आवळ्या. त्याने गुन्ह्याची कबुली देऊन त्याचे साथीदार अलीनजिर अहमद खान, रवीकुमार देवनारायण गौतम, आकाश राकेशकुमार मोदनवाल यांची नावे उघड केली. या चोरट्यांना बिलालपाडा, नालासोपारा पूर्व येथून अटक करून १०० टक्के मालमत्ता आणि गुन्ह्यात वापरलेली कार जप्त करण्यात आली. गुन्हे प्रकटीकरण शाखेचे सहाय्यक पोलीस निरिक्षक ज्ञानेश फडतरे, स्वप्नील कदम, उपनिरीक्षक अविनाश हाटखिळे, हवालदार सचिन लोखंडे, संदीप जाधव यांनी कामगिरी केली.

# लुबाडलेले पावणेपाच लाख मिळाले परत

**मीरा रोड :** काशीगाव येथील महिलेला वर्क फ्रॉम होमच्या नावाखाली ऑनलाइन यु ट्यूब व्हिडीओ लाईक स्टास्क, ऑनलाईन हॉटेल, मूव्ही रेटींगमध्ये गुंतवणूक करण्यास सांगून चार लाख ७६ हजारांची फसवणूक करण्यात आली होती. काशीगाव पोलिसांनी तपास करून फसवणूक झालेली संपूर्ण रक्कम तक्रारदारांना परत मिळवून दिली आहे.

मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशीगाव पोलीस ठाणे परीसरात राहणाऱ्या निलम संकपाळ (३६) यांना वर्क फ्रॉम होमच्या नावाखाली ऑनलाइन यु ट्यूब व्हिडीओ लाईक स्टास्क, ऑनलाईन हॉटेल, मूव्ही रेटींग यांना लाईक अथवा गुंतवणूक केल्यास अधिक नफा मिळवण्याचे आमिष दाखवून फिर्यादीची ४ लाख ७६ हजाराची फसवणूक केली होती. या फसवणुकीच्या अनुषंगाने काशिमीरा पोलीस ठाणे येथे विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.




या तक्रारीची दखल घेऊन तात्काळ गुन्हा दाखल करून घेऊन फिर्यादी यांच्या झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. या माहितीचे अवलोकन केले असता, फिर्यादीची रक्कम वेगवेगळ्या बँक खात्यात वळती झाल्याचे दिसून आले. त्याअनुषंगाने तक्रारदाराची रक्कम गोठवण्याची संबंधित बँकेसोबत पत्रव्यवहार करून संशयित खात्यात रक्कम गोठवण्यात आली. नंतर न्यायालयाकडून फिर्यादीची रक्कम परत मिळवण्यासाठी काशिगाव पोलीस ठाणे अधिकारी, अंमलदारांनी वेळोवेळी पाठपुरावा केला.

NBT - 7.

# उम्मीदों के बोझ तले हर महीने जा रही है 24 लोगों की ज़ान !

## मीरा भाईंदर- वसई विरार में 9 महीने में खुदकुशी के 218 मामले

AI Image



**निसं, वसई:** हर वर्ष 10 सितंबर को विश्व आत्महत्या रोकथाम दिवस मनाया जाता है, ताकि लोग जिंदगी की अहमियत समझें और जिंदादिली से जिएं। लेकिन, मीरा भाईंदर - वसई विरार पुलिस आयुक्तालय के अंतर्गत पिछले 9 महीनों में अलग-अलग कारणों से 218 लोगों ने खुदकुशी की है। आत्महत्या करनेवालों में महिलाओं की संख्या अधिक है, जबकि नाबालिग लड़कों ने भी हताश होकर अपनी जिंदगी को दांव पर लगा दिया। यह जानकारी आरटीआई के जरिए मिली है। 2023 में 433 लोगों की खुदकुशी की थी।

**शहर में बढ़ी आत्महत्या की दर:** बता दें कि वसई-विरार और मीरा-भाईंदर रीजन में आत्महत्या करनेवालों की संख्या में बढ़ोतरी हुई है। सामाजिक कार्यकर्ता सचिन जंभाले ने पुलिस विभाग से आरटीआई के तहत यह जानकारी मांगी थी कि 1 जनवरी से 30 सितंबर 2024 के दौरान शहर और पुलिस आयुक्तालय क्षेत्र में कितने लोगों ने आत्महत्या की है। पुलिस से मिली जानकारी के मुताबिक, इस दौरान यानी पिछले 9 महीने में (1 जनवरी से 30 सितंबर तक) आयुक्तालय में कुल 218 आत्महत्याएं दर्ज की गई हैं। इसमें 13 पुरुष, 51 महिलाएं, 24 नाबालिग लड़के और 13 लड़कियों ने आत्महत्या की है।

### आर्थिक तंगी-क्लेश हैं कारण

पिछले साल 2023 मे 433 लोगो ने खुदकुशी की थी। आत्महत्याओ के कई कारण बताए जा रहे है, जिसमे आर्थिक मंदी, पारिवारिक कलह, बीमारी, प्रेम मे धोखा, परीक्षा मे फेल होना, माता-पिता के डांटने जैसी कई वजह शामिल है। शहर मे आत्महत्या के 70 प्रतिशत मामलो की वजह आर्थिक तंगी और गृहक्लेश है। बेरोजगारी और प्रेम मे निराशा भी एक कारण है। युवा और स्टूडेंट्स भी आत्मघाती कदम उठा रहे है। प्रत्येक माह खुदकुशी का ग्राफ कम होने के बजाय बढ़ ही रहा है। स्वास्थ्य विभाग इस समस्या को लेकर गंभीर नही है। पुलिस के अनुसार, आत्महत्या करने के प्रयास करनेवालो की संख्या भी बढ़ी है।

## झगड़ा होने के बाद पत्नी ने लगाई फांसी

**निसं, वसई:** वाघरल पाडा इलाके में दंपती में हुए झगड़े के बाद पत्नी ने शुक्रवार को फांसी लगाकर खुदकुशी कर ली। वालीव पुलिस स्टेशन से मिली जानकारी के अनुसार, वाघरल पाडा निवासी अनिता देवी राजभर (25) अपने पति ठाकुर प्रसाद के साथ रहती थी। दो पहले उनके बीच किसी बात को लेकर झगड़ा हुआ था। इसी के चलते उसने शुक्रवार की दोपहर घर में फांसी का फंदा बनाया और अपनी जान दे दी। फ़िलहाल पुलिस मामले की जांच कर रही है।

CamScanner

The Free Press Journal
Page No. 7

# More than 1 suicide daily in 2023 in Mira Road-Virar

**Suresh Golani**
MIRA-BHAYANDAR

On average, more than one person died by suicide every day under the jurisdiction of the Mira Bhayandar-Vasai (MBVV) Police Commissionerate in 2023. A reply to a Right to Information (RTI) query by social activist Sachin Jhamble threw up this startling revelation. The reply given by the public information officer – Assistant Commissioner of Police (Crime) Madan Ballal – states that as many as 433 people ended their lives in 2023.

This year until September, 218 people, including 13 men, 51 women, 24 boys and 13 girls, took the extreme step. The Kashigaon police station has reported eight cases of deaths by suicide since its inception in March 2024. However, the registry of the police department has no record about the number of suicide attempts.

Family problems, illness, failed or one-sided relationships, marital disputes, exam failures and financial stress remain the main causes. After the elevation of the existing rural format of the Thane and Palghar police to a combined MBVV Commissionerate in 2020, the number of police stations have gradually increased from 13 to 19. This apart from a Bharosa Cell established by the MBVV police in a bid to address the increasing number of domestic and other disputes for preventing extreme measures through counselling sessions conducted by a team of experts.

*If you or anyone you know is struggling with suicidal thoughts, seek help by calling Aasra (9820466726), Snehi (9582208181), or Fortis MentalHealth (8376804102)*

**MAIN CAUSES**

Family problems

Marital disputes

Exam failures

**433 people ended lives in 2023, says reply to RTI query; 218 suicides have been reported until Sept this year**

# 4 offer lift, rob bus conductor at knifepoint; held in 24 hrs

**Suresh Golani**
MIRA-BHAYANDAR

The Virar police have arrested four persons for brutally assaulting and robbing a 35-year-old bus conductor at knifepoint under the guise of offering him a lift. Notably, a sticker on the car helped cops track down the accused within 24 hours.

The police said the conductor, who was headed to his workplace in Andheri, was waiting for a bus to reach the Virar railway station at around 3.30am on October 20. A Maruti Ertiga with four occupants stopped near him and offered to drop him. The unsuspecting victim agreed but was driven to a secluded area where he was assaulted and robbed of his valuables, including cash, Bluetooth and a mobile phone.

The quartet fled after pushing him out near a dargah. The conductor alerted the police. An investigating team checked CCTV cameras installed at the crime scene and possible getaway routes. A car with the sticker of a human rights organisation was spotted and its owner was traced. He claimed he gave the car to one Ashraf Issaquah, who was taken into custody from Borivali.

Ashraf confessed to the crime and revealed the names of his accomplices – Alinijar Khan, 22, Ravikumar Gautam, 26, and Akash Modanwal, 22. The police impounded the car and recovered the stolen booty.

CamScanner